PARLE TILAK VIDYALAYA ASSOCIATION'S
# MULUND COLLEGE OF COMMERCE
(Affiliated to the UNIVERSITY OF MUMBAI)
SAROJINI NAIDU ROAD, MULUND (WEST), MUMBAI - 400 080.
Tel.: 2560 0017, 2565 0257 • Fax : 2568 5550
NAAC ACCREDITED GRADE "A"
(Cycle-I 2004, Cycle-II 2011, Cycle-III 2016)
E-mail : mccmulund@gmail.com • Website : www.mccmulund.ac.in

दिनांक - २५.१०.२०२३

**शिष्यवृत्ती कार्यासन**

संदर्भ-२०/ ७०१

## परिपत्रक

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्याकरिता सूचना

१. भारत सरकार शिष्यवृत्ती व फ्रिशीप योजना (SC, ST, OBC, VJ-NT A-B-C-D)
२. भारत सरकार दिव्यांग शिष्यवृत्ती योजना (Only Handicapped Students)
३. गुणवान विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य योजना (FAMS)
४. अल्पसंख्याक शिष्यवृत्ती (राज्य सरकार) (Muslim, Sikh, Buddhist, Christian, Parsi, Jain & Jews)
५. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (Open, EBC, SEBC & EWC)

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता महाविद्यालयाती सर्व अकरावी (FYJC) व बारावी (SYJC) तसेच पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास शिकत असणाऱ्या दिव्यांग (Handicap), Open, SEBC, EWS, Minority, SC, ST, OBC, SBC, VJ-DT A-B-C-D प्रवर्गातील विद्यार्थ्यांना कळविण्यात येत आहे की, सन २०२३-२४ करिता वरिल शिष्यवृत्ती योजनेकरिता शासनाने दिनांक - ११/१०/२०२३ पासून

https://mahadbt.maharashtra.gov.in/Home/Index

हे संकेतस्थळ सुरु करण्यात आलेल आहे. तरी वरील नमूद केलेल्या सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता त्वरीत अर्ज करावयाचा आहे. SC, OBC, SBC, VJ-NT A-B-C-D प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी (ज्यांचा मागील वर्षाचा अर्ज मंजूर आहे) पुन्हा नव्याने उत्पन्नाचा दाखला काढाण्याची आवश्यकता नाहि, परंतु Open, SEBC, EBC, EWL, Minority आणि ST प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मात्र नव्याने २०२३-२४ या वर्षाचा उत्पन्नाचा दाखला काढून MahaDBT या संकेतस्थळावर (Personal Details) मध्ये अपलोड करणे आवश्यक आहे, तसे न केल्यास सदर अर्ज नामुंजूर करण्यात येईल. शिष्यावृत्ती करिता अर्ज केल्यानंतर सदर अर्ज मुजूर झाला आहे किंवा नाही हे तपासून घेण्याची सर्वस्वी जवाबदारी विद्यार्थ्यांची राहिल. विद्यार्थ्यांना अर्ज भरताना कोणतीही अडचण निर्माण झाल्यास त्वरीत संस्थेच्या शिष्यावृत्ती कर्मचाऱ्याशी संपर्क करावा, तसेच

https://mahadbt.maharashtra.gov.in/Home/Index या संकेस्थळावरील Grievance/Suggestions या पर्यायाचा सुध्दा वापर करावा. जर एखादा विद्यार्थी त्याच्या निष्काळजीपणाने **वरिल योजनांचा अर्ज भरण्यापासून वंचित राहून गेल्यास प्रत्येक वर्षे शेवटी त्यांना उर्वरीत खुला (Open) प्रवर्गा इतकी फी भरावी लागेल, याची विद्यार्थी/पालकांनी नोंद घ्यावी.**

प्राचार्य
डॉ. सोनाली पेडणेकर

**मार्गदशक सूचना** :

**https://mahadbt.maharashtra.gov.in/Home/Index**

१. या संकेतस्थळावर सर्व विद्यार्थ्यांनी नोदणी केल्यानंतर युझरनेम व पासवर्ड स्वत:च्या ई-मेलवर व्यवस्थीत नोंद करुन ठेवावा. जेणे करुन एकाच युजननेम व पासवर्ड ने तुम्हाला दरवर्षी शिष्यवृत्तीचा अर्ज भरावयाचा आहे.

२. Domicile Certificate विद्यार्थ्याचे असणे गरजेचे आहे.

३. Income Certificate मध्ये नवीन (Fresh) विद्यार्थ्यांनी २०२३-२४ व नुतनीकरण (Renewal) विद्यार्थ्यांनी ज्यावेळी प्रथम अर्ज केला होता त्या वर्षाचे अपलोड करावे.
ST, Open, SEBC, EWS प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मात्र २०२३-२४ या वर्षाचेच Income Certificate काढणे गरजेचे आहे. मात्र SC, OBC, SBC, & VJNT विद्यार्थ्यांनी पहिल्या वर्षी जे (ज्या वर्षी या महाविद्यालयातील प्रथम अर्ज मंजूर झाला होता) Income Certificate काढले आहे तेच Income Certificate अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत ग्राह्य राहिल.

४. Past Information मध्ये प्रथम दहावी, बरावी, प्रथम वर्ष, /द्वितीय वर्ष अनुक्रमे माहीती भरावयाची आहे.

५. Current Information मध्ये प्रथम वर्ष,/ द्वितीय वर्ष, /तृतीय वर्ष या अनुक्रमाणे भरावी.

६. मागील वर्षाच्या गुणपत्रिका अपलोड करताना विद्यार्थ्यांनी दोन्ही सत्रांच्या (Both Semester Result) यांचे एकत्रित फोटो किंवा स्कॅन करुन अपलोड करावेत.

७. Fees Paid मध्ये SC, ST, OBC, SBC & VJNT विद्यार्थ्यांनी ० शुन्य (Zero) इतकी रक्कम भरावयाची आहे, कारण महाविद्यालय मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शासनामार्फत मंजूर करण्यात येणारी रक्कम घेतली जात नाही, तसेच Open, SEBC, EWS विद्यार्थ्यांनी जर फक्त Tution Fees ची पूर्ण रक्कम भरली असेल तरच त्यांनी पूर्ण ची रक्कम भरावयाची आहे अन्यथा ० शुन्य (zero) इतकी रक्कम भरावयाची आहे. मात्र अपंग शिष्यवृत्ती योजनेकरिता विद्यार्थ्यांनी जेवढी फी भरली आहे तेवढीच फी तेथे टाकावयाची आहे.

८. LC/TC Certificate मध्ये विद्यार्थ्यानी या महाविद्यालयात प्रवेश घेताना जे शेवटचे महाविद्यालय सोडले होते त्या महाविद्यालयाचे Leaving Certificate/Transfer Certificate अपलोड करावे.

९. Undertaking/ प्रतिज्ञापत्र प्रिंट काढून योग्य रितीने भरावा, भरताना विद्यार्थ्यांनी त्यामध्ये जसेच्या तसे योजनेचे नाव लिहायचे आहे, तसेच त्यावर दिनांक, ठिकाण, पालकाची स्वाक्षरी तसेच विद्यार्थ्याची स्वाक्षरी करुल अपलोड करावे. (Undertaking/प्रतिज्ञापत्र) नमुना प्रत सोबत जोडल आहे)

१०. बरेच विद्यार्थी फी भरल्याची पावती अपलोड करण्याऐवजी फी भरल्याचा स्क्रिन शॉट अपलोड करतात, तसे न करता महाविद्यालयाच्या कार्यालयातून फी भरल्याची रिसीट मिळवावी अथवा https://www.feepayr.com/ या वेब पोर्टल वरुन ती मिळवावी व ती योग्यरित्या अपलोड करावी.

११. विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्रे अपलोड करताना स्पष्ट दिसणारी प्रमाणपत्रे २५६ KB मध्ये JPG अथवा PDF Type मध्ये अपलोड करावीत.

१२. सर्व अर्जांची ऑनलाईन पध्दतीने पडताळणी करण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी अचुक व योग्य माहिती भरावी अन्यथा अर्ज पुन्हा विद्यार्थ्यांच्या लॉगिनला पाठविण्यात येतील. विद्यार्थ्यांचे अर्ज योग्य असल्यास Desk १ Verification, Desk २ Verification व अपूर्ण अर्ज Sent Back to Application अश्या प्रकारचे मेसेज आधार संलग्न मोबाईल क्रमांकावर येतील. अर्ज Sent Bank to Application का केला आहे याचे कारण पाहण्यासाठी My Applied Scheme मध्ये जाउन Application ID वर क्लिक करावे व सदर बदल करुन विद्यार्थ्यांनी पुन्हा Schem ला Re-apply करणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास तुमचा अर्ज महाविद्यालयाच्या लॉगिन ला येणार नाही. त्यामुळे सदर अर्ज मुंजुर करता येणार नाहि. परिणामी विद्यार्थ्यास वर्ष अखेर खुल्या प्रर्वगाची फी भरावी लागेल. तसेच सदर अर्ज ऑनलाईन प्रणालीमधून Reject होउन जातील कोणतीही अडचण येत असल्यास https://mahadbt.maharashtra.gov.in/Home/Index या संकेतस्थळाच्या Grievance/Suggestion या पर्यायामध्ये सदर अडचणी टाकणे.

१३. मागील वर्षाची शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी My Applied Scheme History वर क्लिक करावे.

१४. विद्यार्थ्यांनी जो मोबाईल क्रमांक सध्या वापरणार आहे तो मोबाईल क्रंमाक आपल्या आधार कार्ड क्रमांकाला आधार कार्ड केंद्रातून संलग्न/लिंक करुन घ्यावयाचा आहे व ज्या बँकेत विद्यार्थ्याचे खाते आहे त्या बँकेत जाउन NPCI पोर्टलवर आधार कार्ड क्रमांक संलग्न/लिंक करुन देण्यासाठी सांगायचे आहे. जर विद्यार्थ्याचे आधार कार्ड क्रमांक NPCI पोर्टलवर लिंक नसल्यास विद्यार्थ्याला तसेच महाविद्यालयाला शिष्यावृत्तीची रक्कम मिळणार नाही. परीणामी होणाऱ्या आर्थिक नुकसानीस विद्यार्थी व पालक स्वत: जबाबदार राहतील.

१५. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी त्या अर्जाची प्रिंट व संबधित कागदपत्रांच्या प्रती महाविद्यालयाच्या कार्यालयात जमा कराव्यात. विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याची अंतिम तारीख विचारण्यासाठी कार्यालयात येवू नये.

अर्ज भरणयाची अंतिम तारीख https://mahadbt.maharashtra.gov.in/Home/Index या संकेतस्थळावर शासनामार्फत वेळोवेळी प्रदर्शित करण्यात येईल, परंतु अंतिम तारखेची वाट न पाहता विहीत वेळेत विद्यार्थ्यानी अर्ज भरावेत जेणेकरुन आपले अर्थिक नुकसान होणार नाही याची विद्यार्थी व पालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

प्राचार्य
डॉ. सोनाली पेडणेकर